# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 362/2023 दिनांक : 20.09.2023

## 1)चोरीचा प्रयत्न :–

**वजिराबाद :–** दिनांक 19.09.2023 रोजी चे 07.00 वा. चे सुमारास, **शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय दवाखान्याच्या पायऱ्यावर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने शासकीय आयुर्वेद महाविद्यालय येथील दवाखान्याच्या पायऱ्यावर ठेवलेले सोलार फिटींगचे क्लीप 230 नग किंमती 5520/–रू चा माल पिवळया नायलनच्या पोत्यामध्ये चोरी करून नेत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सुनिल पि. राजवीर बागडी, वय 49 वर्षे, व्यवसाय नौकरी (सफाई कामगार शासकीय आचुर्वेदीक महाविद्यालय ) सोमेश कॉलनी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 413/2023 कलम 379, 511 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1218 मठपती, मो. क्रं. 9420914042** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 18.09.2023 रोजी चे 14.00 वा. चे सुमारास, **साईबाबानगर सिडको नांदेड येथे,** यातील आरोपी हा फिर्यादीचे पती असुन फिर्यादीने दारू का पिलात असे म्हणाले असता यातील नमुद आरोपीने शिवीगाळ व थापडबुक्याने मारहाण करून मुक्का मार दिला व केस धरून खाली पाडुन तोंडावर बुक्कीने मारून खालचे दोन दात पाडले व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी लक्ष्मीबाई सदाशिव शिंदे, वय 26 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. दहीकळंबा ता. कंधार ह. मु. साईबाबानगर सिडको येथे पेरके यांचे घरी किरायाने ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 675/2023 कलम 325, 323, 504, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री शिंदे, मो. नं. 9511851737** हे करीत आहेत.

**2)कुंटूर :–**दिनांक 19.09.2023 रोजी चे 07.30 वा. चे सुमारास, **मौ. सावरखेड फिर्यादीचे घराजवळ मरूमाईचे मंदीरा वजळ ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना तुझी गाडी बाजुला घे म्हणुन शिवीगाळ करून वाद घालीत असतांना आरोपीतांनी लाथा बुक्यानी मारहाण करून डोके फोडुन दुखापत केली व फिर्यादीचे वडील व आई यांना शिवीगाळ करून मारहाण केली. वगैरे **फिर्यादी शिवराज आनंदा गायकवाड, वय 32 वर्षे, व्यवसय मजुरी रा. सावरखेड ता. नायगांव जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरन 168/2023 कलम 324, 323, 504, 34, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/सुवर्णकार, मो. नं. 9834096112** हे करीत आहेत.

## 3)जुगार :–

**1)भोकर :–** दिनांक 19.09.2023 रोजी चे 18.30 वा. चे सुमारास, **बसस्थानक समोरील सुपर पानशॉप पटीच्या पाठीमागे ढोले यांच्या बिल्डींगच्या एका सेंटर मध्ये भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य 1200/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/815 परमेश्वर जिवनराव कळणे, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 329/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री दिलीप जाधव, मो.क्रं. 8605430645** हे करीत आहेत.

## 4)प्रोव्हिबीशन :–

**1)मुखेड :–** दिनांक 19.09.2023 रोजी चे 10.35 वा. चे सुमारास, **वा. चे सुमारास, मुखेड ते देगलुर जाणारे रोडवर केरूर फाटयाच्या पुर्वेस ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3360/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/सुनिल भिमराव राठोड, ने. पोस्टे मुखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 271/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री वाघमारे, मो.नं. 9923481762** हे करीत आहेत.

**2)ईस्लापुर :–** दिनांक 19.09.2023 रोजी चे 17.10 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरा समोर सेवादास तांडा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभटीची गावठी दारू किंमती 1400/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/नारायण शिवाजीरा पांचाळ, ने. पोस्टे ईस्लापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे ईस्लापुर** गुरनं 92/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास जीपोउपनि/श्री कांबळे, मो.नं. 9552591244** हे करीत आहेत.

## 5)पाण्यात बुडून मृत्यु :–

**हिमायतनगर** :–दिनांक 19.09.2023 रोजी चे 12.30 वा. चे सुमारास, **मौ. सवना शिवार देवराव कोंडबा होनवने यांचे शेताचे बाजुला असलेल्या खदानित ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे राहुल बालाजी भालेराव, वय 20 वर्षे, रा. सवना ता. हिमायतनगर जि. नांदेड** हा देवराव होनवने यांचे शेतात फवारणी कामी गेला होता. तो फवारणी साठी पाणी अनन्या करीता खदानिकडे गेला असता त्याचा पाय घसरून तो पाण्यात बुडून मरण पावला. वगैरे **खबर देणार बालाजी मारोती भालेराव, वय 43 वर्षे, व्यवसाय शेती रा. सवना ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे हिमायतनगर** आ. मृ. **28**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1966 आऊलवार, मो.नं. 9763255035** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 362 / 2023 दिनांक : 20.09.2023**

**1 ऑक्टोबर, 2023 रोजी ईद–ए–मिलादुन्नबीची मिरवणुक साजरी करण्यात येत असले बाबत.**

दिनांक 28.09.2023 रोजी ईद–ए–मिलादुन्नबी व श्री गणेश वित्सर्जन एकाच दिवशी येत असुन नांदेड शहरामध्ये मिरवणुकीचा मार्ग एकच असल्याने मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली व पोलीस अधीक्षक, व पोलीस अधिकारी मरकजी मिलाद कमीटी व त्यांचे सदस्य यांची दिनांक 19.09.2023 रोजी नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पार पडली. सदर बैठकीमध्ये दोन्ही सण एकाच दिवशी येत असल्याने सविस्तर चर्चा झाली. दोन्ही मिरवणुका एकाच दिवशी काढल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणुन, धार्मीक सलोखा ठिकवण्सासाठी प्रशासनाच्या विनंतीचा मान ठेवुन सर्वानुमत्ते ईद–ए–मिलादुन्नबीची मिरवणुक 1 ऑक्टोबर, 2023 रोजी काढण्याचे मरकजी मिलाद कमीटीने जाहीर केले आहे.

प्रतिवर्षी ईद–ए–मिलादुन्नबीची मिरवणुकीचे नांदेड शहरामध्ये मरकजी मिलाद कमीटी तर्फे आयोजन करण्यात येते. सदर मिरवणुक ही निजाम कॉलनी श्रीनगर नांदेड येथुन निघुन आयटीआय, शिवाजीनगर, कलामंदीर, वजिराबाद, शासकीय रूग्णालय, महात्मा गांधी पुतळा, महाविर चौक, गुरूद्वारा चौक, जुना मोंढा, एमजीएम रोड मार्गे निघुन अहाता मस्तानशह वल्ली दर्गाह मिलाद ग्राऊंड येथे समाप्त होते. परंतु दिनांक 28.09.2023 रोजी ईद–ए–मिलादुन्नबी व श्री गणेश वित्सर्जन एकाच दिवशी येत असुन नांदेड शहरामध्ये मिरवणुकीचा मार्ग एकच असल्याने या विषयावर पोलीस प्रशासनाकडुन मरकजी मिलाद कमीटी व सुन्नी पंथीय धर्मगुरू, शहरातील विवीध संघटना सोबत वारंवार बैठका घेवुन सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेला मरकजी मिलाद कमीटी तर्फे सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला व शहरामध्ये शांतता व सुव्यवस्था अबादीत राहावी, सलोख्याचे वातावरण टिकुन राहावे, या करीता सदर निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयाचे पोलीस प्रशनाने स्वागत केले आहे.

सदर बैठकीस **मा. श्री अभिजीत राऊत**, जिल्हाधिकारी नांदेड, **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री. अबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री. महेश वडदकर**, उप विभागीय अधिकारी नांदेड, **मा. श्री सुरज गुरव**, उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर, **मा. श्री. सुशिलकुमार नायक**, उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा नांदेड, **मा. श्री संजय वारकड**, तहसीलदार नांदेड, व शहरातील सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांच्या उपस्थीत मरकजी मिलाद कमीटीचे पेट्रॉन हजरत मुक्ती, तुराबोद्दीन रझवी, हजरत मुक्ती मुर्तूजा मिसबाही, हजरत मनशाद आलम, मौलाना सादीक व इतर सुन्नी धर्मगुरू आणि मरकजी मिलाद कमीटीचे अध्यक्ष **महमद रफीक अशरफीवाला**, उपाध्याक्ष सुफी मोहमद आली कादरी, सचिव ॲड आयुबोद्दीन जाहागीरदार, कोषाध्यक्ष हाजी अहमद शेख, नवीवाला व मरकजी मिलाद कमीटीचे इतर सदस्य ॲड शेख झियाऊदीन, ॲड सलील गिगानी, ॲड सय्यद दाऊदखान, ॲड शेरअली खॉन, ॲड हाजी अहमद, ॲड पिर महमद, पाशा बाई, मिरजा असद बेग, वाजीद अन्सारी, मुन्नाभाई व इतर सदस्य हजर होते.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

